



RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784






वर्ष ३ रे अंक : १४१ वा बुधवार दि. ०९ जुलै २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# जमीन व्यवहारांच्या पडताळणीबाबत बुलढाणा जिल्ह्यात निर्णय कधी होणार?

## पुण्यात कारवाईला सुरवात, बुलढाण्यातील वरिष्ठ अधिकारी मात्र अद्यापही ढिम्म

**जनसंचलन/बुलढाणा**

गेल्या काही महिन्यांमध्ये पुणे जिल्ह्यात जमीन व्यवहारांमध्ये झालेल्या अनेक प्रकारच्या अनियमिततांच्या तक्रारी प्रचंड वाढल्यामुळे राज्याचा महसूल विभाग ॲक्शन मोडवर असून, गेल्या काही वर्षांमध्ये झालेल्या जमीन मोजणी, खरेदी-विक्री, सातबाऱ्यावरील सर्व नोंदी, त्यासंदर्भात देण्यात आलेले शासकीय आदेश या सर्वांची तपासणी करण्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रकारामुळे पुणे महसूल विभागात चांगलीच खळबळ उडालेली आहे. परंतु बुलढाणा जिल्हा देखील जमिनीतील गैरव्यवहारांबाबत अपवाद राहिलेला नाही. परंतु बुलढाण्यात मात्र अद्यापही जमीनीची कागदपत्रे व व्यवहारांबाबत अद्यापही कोणतीच कारवाई करायला तयार नसल्याचे दिसत आहे. अधिकाऱ्यांच्या या ढिसाळपणामुळे मात्र महसूल विभागातील भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांचे फावते आहे. राज्याच्या महसूल मंत्र्यांनी खऱ्या अर्थाने याकडे पाहणे गरजेचे आहे.बुलढाणा जिल्ह्याच्या महसूल विभागात वर्षानुवर्षांपासून एक महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी भ्रष्टाचाराचे अनेक विक्रम प्रस्थापित करीत आहे. विजय दत्तात्रय टेकाळे हे त्या मंडळ अधिकाऱ्याचे नाव. भ्रष्टाचार करताना कसलीही लाजलज्जा न बाळगता या महाठगाने भ्रष्टाचारात आता अक्षरशः पीएचडी प्राप्त केली आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आपली नोकरी व पदाचा दिवसाढवळ्या दुरुपयोग करून अनेक जमिनीमध्ये नियमबाह्य गैरव्यवहार केले. अनेकांची लुबाडणूक केली. त्यातून प्रचंड बेनामी माया जमवली. शासनाच्या महसुलाला चुना लावला. अनेक नागरिकांची धादांत फसवणूक केली. मात्र एव्हढे सगळे करून त्याला सगळे गुन्हे आजवर माफ करण्यात आले. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजच्या सततच्या पाठपुराव्यामुळे अखेर काही दिवसांपूर्वी टेकाळे नावाच्या या महाठगाची मेहकर तालुक्यात बदली करण्यात आली. टेकाळे हे वर्षानुवर्षे एकाच पदावर राहत होते. कारण पदावरून हटल्यास आपला भ्रष्टाचार बाहेर येईल, याची त्यांना भीती होती. विशेष म्हणजे टेकाळेंच्या बेशरमपणे एकाच जागी चिकटून राहण्यात त्यांना वरिष्ठ अधिकारी देखील मदत करीत होते. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने एव्हढ्या मोठ्या प्रमाणात पाठपुरावा केला की, या वेळेस तालुक्याच्या बाहेर टेकाळेंची बदली करणे ही प्रशासनाची अक्षरशः मजबुरी बनली होती. पुणे जिल्ह्यात जमिनींमध्ये गैरव्यवहार उघड झाल्यानंतर आता गेल्या काही वर्षांमध्ये जी काही जमिनीची मोजणी वा सातबाऱ्यावर बदल करण्यात आले, त्या सर्वांची चौकशी करून ज्यांनी गैरव्यवहार केला आहे त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे. यासंदर्भात पुण्याचे महसूल आयुक्त आणि जिल्हाधिकारी हे ॲक्शन मोडवर आहेत. गेल्या पाच वर्षांमध्ये तलाठी,

**बहुचर्चित मंडळ अधिकारी महाठग विजय टेकाळे यांच्यावर विभागीय चौकशी सुरू असतांना त्यांनी परिवारातील सदस्यांच्या नावावर असलेली शहराला लागूनच भरवस्तीतील १०२ गुंठे जागा ही सर्व नियमधाब्यावर बसवून दुसऱ्याच्या नावे केली.या प्रकरणात महसूल व रजिस्टार खरेदी विक्री विभागातील अधिकारी यांनी कशी शाळा भरवली पुढील सत्रात...**

मंडळ अधिकारी, तहसीलदार व प्रांताधिकारी यांनी जमिनीसंदर्भात जे काही निर्णय घेतले, त्याची पडताळणी करण्यासाठी तालुकानिहाय अधिकाऱ्यांच्या नेमणुकादेखील करण्यात आल्या आहेत. त्याच धरतीवर बुलढाण्यात देखील चौकशी करण्याची गरज आहे. या ठिकाणी देखील जमिनीच्या गैरव्यवहारांची चौकशी झाल्यास कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार बाहेर येऊ शकतो. काही भ्रष्टाचाऱ्यांना जेलची वारी करावी लागू शकते. महसूल प्रसासनावर लोकांचा विश्वास वाढण्यासाठी खरे तर ही कारवाई गरजेची आहे. मात्र, मुख्य मुद्दा आहे की अशी चौकशी व कारवाई करण्याची महसूलच्या अधिकाऱ्यांमध्ये हिम्मत आहे का? कारण गेल्या अनेक वर्षांमध्ये विजय टेकाळे नावाच्या महाठगाची व महाभ्रष्टाचाऱ्याची सर्व पापे अधिकाऱ्यांनी पोटात घातली. नाही म्हणायला त्यांची मेहकरला बदली केली आहे, परंतु ही बदली




रद्द करण्यासाठी टेकाळे जोरदार लॉबिंग करण्याची शक्यता आहे. ते वेळप्रसंगी अधिकाऱ्यांवर राजकीय किंवा आपल्या संघटनेच्या माध्यमातून दबाव आणू शकतात. परंतु आता नुसते बदलीवर भागणार नाही, तर टेकाळेंना भ्रष्टाचार प्रकरणी थेट सेवेतून बडतर्फ करण्यात यावे, तसेच त्यांनी बेबंद भ्रष्टाचारातून कमावलेली संपत्ती लवकरात लवकर शासन दरबारी जप्त करावी.असे झाल्यास भ्रष्टाचाऱ्यांना जरब बसेल व महसूल विभागाचे कामकाज सुरळीत चालेल. जोपर्यंत हे सर्व काही होत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने भ्रष्टाचाराविरोधात आपली लेखणी सुरूच ठेवणार आहे.

## बालविवाहप्रकरणी लोणार तालुक्यातील तिघांविरोधात गुन्हा दाखल..

**जनसंचलन/ लोणार**

अल्पवयीन मुलीसोबत विवाह केल्याप्रकरणी बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार लोणार तालुक्यातील तिघांविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ही घटना एप्रिल महिन्यात घडली असून, बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांच्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली आहे. लोणार तालुक्यातील एका गावातील एका कुटुंबाने ३० एप्रिल २०२५ रोजी जाफ्राबाद येथील एका संस्थान परिसरात आपल्या मुलाचा विवाह पार पाडला होता. विवाहानंतर काही संशयास्पद बाबी ३० एप्रिल २०२५ लावण्यात रोजी आला होता विवाह लक्षात आल्याने संबंधित प्रकरणाची माहिती बालविवाह प्रतिबंध अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात आली. त्यानंतर विवाहातील वधू ही कायद्याने निर्धारित वयापेक्षा कमी असल्याचे पुराव्यानिशी स्पष्ट झाले. या प्रकरणी वर मुलगा, त्याचे वडील व मुलीच्या बालविवाह पालकांवर प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जाफ्राबाद येथील बालविवाह प्रतिबंध



अधिकारी किशोरकुमार देवकर यांनी लोणार पोलिस स्टेशनमध्ये दिलेल्या तक्रारीवरून अनुषंगिक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्ह्यात अलिकडील काळात बालविवाहाचे प्रमाण वाढले आहे

## वन कर्मचाऱ्यांना साहित्य द्यावे!

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

देऊळगाव राजा पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जंगलात गस्त घालणाऱ्या वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना रेनकोट, शूज, काठी, टॉर्च-बॅटरी यांसारख्या आवश्यक सुरक्षाविषयक साहित्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी वनरक्षक-वनपाल संघटनेने केली आहे. यासंदर्भात वनरक्षक-वनपाल संघटनेचे जिल्हाध्यक्ष गजानन पोटे यांनी उपवनसंरक्षक (प्रादेशिक) यांना ७ जुलै रोजी निवेदन दिले. निवेदनानुसार, पावसात वन्य प्राण्यांच्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठी आणि जंगलाच्या संरक्षणासाठी साहित्य अत्यावश्यक असल्याचे संघटनेचे मत आहे. याशिवाय गस्तीदरम्यान कर्मचाऱ्यांकडे असलेले शासकीय दस्तऐवज ओले होण्यापासून वाचवता येतात. गेल्या दोन वर्षांपासून ही मागणी सातत्याने केली जात आहे; मात्र, अद्यापही संबंधित साहित्य पुरविण्यात आलेले नाही. या पार्श्वभूमीवर, आता पावसाळा सुरू झाल्याने कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने साहित्य उपलब्धन करून द्यावे, अशी मागणी संघटनेने निवेदनातून केली आहे.

# मुलांवर विश्वास ठेवा!

## संपादकीय लेख

तूच आमचं भविष्य आहेसफ ङ्गतुझ्या यशातच आमचं समाधान आहेफ ङ्गआम्ही इतका खर्च केलाय तुझ्यावर...फ अशा किती तरी वाक्यांचा रोज सामना करणारी मुलं आज सर्वांत मोठी मानसिक हिंसा सहन करत आहेत. त्या हिंसेला शब्द नसतो; परिणाम मात्र भयंकर असतो. काही वेळा आत्महत्येच्या टोकापर्यंत नेणारा! सांगली जिल्ह्यातील हृदयद्रावक घटना हादरवून टाकणारी आहे. एका मुख्याध्यापक बापाने मुलीला अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाले, म्हणून मारहाण केली. अखेर मुलगी बेशुद्ध होऊन मरण पावली. ही बातमी केवळ एका घराची नाही, तर संपूर्ण समाजाच्या कोसळणाऱ्या मानसिक आरोग्याची आहे. पालक म्हणून आपल्याला पाल्यांकडून अपेक्षा असतात. त्यात गैर काही नाही; पण आपण त्या अपेक्षांचं रूपांतर ओझ्यात, दडपशाहीत करतोय का, याचा विचार कधी करतो का? आज शिक्षण म्हणजे केवळ मार्कांची शर्यत बनली आहे. नीट, जेईई, यूपीएससी किंवा सीईटी अशा परीक्षाच भविष्य घडवतात, हा समज आपण बेमालूमपणे करून घेतो आणि मुलांनाही त्यात ढकलतो. ही आपल्याकडील शिक्षणपद्धतीची, पालकत्वाच्या चुकीच्या कल्पनांची, आणि समाजाच्या एकंदर विकृत अपेक्षांची मिळून घडलेली शोकांतिका आहे. पालक म्हणून आपण मुलांचं भावविश्व समजून घेण्याचा प्रयत्न करतो का? केवळ स्मार्टफोन, बाइक आणि ब्रँडेड वस्तू देऊन आपण जबाबदारी संपल्याचं गृहीत धरतो. आपण त्यांना शिकवतो स्पर्धा करा, टॉप करा, यशस्वी व्हा; पण स्वत:ला समजून घ्या, अपयशातून शिका किंवा जगायला शिका, असे कधी शिकवतो का? आजची मुलं ताणतणावाखाली जगत आहेत. पालकांची अपार अपेक्षा, शिक्षकांचा अभ्यासाचा भार, सोशल मीडियावरचं तुलनात्मक आयुष्य, मैत्रीचं दडपण हे सगळं त्यांच्या कोवळ्या मनावर कोरलं जातंय. अशा वेळी अपयशाचं धैर्याने स्वागत न करता त्याला शिक्षा दिली, तर परिणाम काय होणार? मुलं म्हणजे यंत्र नाहीत. एका बटणावर ङ्गसक्सेसफमिळेल, एवढं सोपं त्यांचं आयुष्य नाही. प्रत्येक मुलाची बौद्धिक, मानसिक, शारीरिक आणि भावनिक क्षमता वेगळी असते. ती समजून घेतली पाहिजे. एखादी मुलगी ङ्गनीटफमध्ये कमी गुण मिळवते, म्हणजे ती आयुष्यात निकामी ठरते का? इतिहास सांगतो शाळा-कॉलेजमध्ये मध्यमगती ठरलेली अनेक माणसं आयुष्यात अफाट यशस्वी झाली आहेत. या घटनेतल्या मुलीचं काय चुकलं होतं? कमी गुण मिळाले, तरी आयुष्यात अजून संधी होत्या. त्या हरवण्यामागे तिचं अपयश नव्हे, तर बापाच्या अपेक्षांचा अतिरेक आणि हिंसेची क्रूरता होती. शिक्षण हे केवळ परीक्षेपुरतं मर्यादित नसलं पाहिजे. ते मुलं घडवणारं, त्यांना समजून घेणारं, जीवनाला दिशा देणारं असावं लागतं. दुर्दैवाने आज ते मार्क, रँक, स्कोअर, पॅकेज आणि सर्टिफिकेट यापलीकडे काही उरत नाही. आणि त्याला आपणच जबाबदार आहोत पालक म्हणून, शिक्षक म्हणून, समाज म्हणून. आपली मुलं रेसच्या घोड्यांसारखी उभी केली आहेत आपण. त्यांना शिकण्याचा आनंद नाही, केवळ यश मिळवण्याचा तगादा आहे. त्यांना वाटतं, अपयश आलं तर आई-बाबा त्यांना तोंड दाखवणार नाहीत. हीच भावना त्यांना पिळवते, खचवते, आणि



कधी जीव घेते. म्हणूनच हे बदलायलाच हवं. आपल्या अपेक्षा ठेवा, पण त्या मानवतावादी ठेवा. मुलांनी जर अपयश पचवलं, तर ते यशही मोठ्या आत्मविश्वासानं मिळवतील. त्यांच्यावर विश्वास ठेवा. त्यांना सांगा, हरकत नाही, पुढच्या वेळेस जमेल, तुझा प्रवास तूच ठरव, आपण सोबत आहोत. जगण्यासाठी हजारो क्षेत्रं आहेत. एक यश मिळालं नाही म्हणून जग थांबत नाही. थांबवायचं आपणही नाही विशेषत: आपल्या लेकरांच्या स्वप्नांना, त्यांच्या श्वासांना. अपेक्षा ठेवा; पण प्रेमात गुंफ ून. शिस्त ठेवा; पण समजूतदारपणात. कारण, एक पालक आपल्या मुलाच्या स्वप्नावर विश्वास ठेवतो, तेव्हा त्या मुलाचा आत्मविश्वास अढळ बनतो आणि अशा विश्वासातूनच खरं यश जन्म घेतं!

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा २० वा हप्ता जुलैमध्ये मिळणार

## शेतकऱ्यांनो, ई-केवायसी, आधार सीडिंग करा- कृषी विभागाचे आवाहन




जनसंचलन/बुलढाणा

केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या २० व्या हप्त्याचा लाभ जुलै, २०२५ मध्ये वितरीत करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील ३ हजार २२२ शेतकऱ्यांची ई केवायसी आणि ४ हजार ५३४ शेतकऱ्यांचे आधार सीडिंग प्रलंबित आहे. शेतकऱ्यांनी प्रलंबित ई केवायसी, आधार सीडिंग व बँक खात्याला डिबीटी इनेबल करणे किंवा इंडिया पोस्ट पेमेंट बँक मध्ये खाते उघडून त्या खात्याला आधार संलग्न करून डिबीटी इनेबल करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेसाठी केंद्र आणि शासनाकडून वार्षिक प्रत्येकी सहा हजार आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेमार्फत वार्षिक प्रत्येकी सहा हजार रुपये शेतकरी कुटुंबांना दिले जात आहेत. त्यासाठी ई-केवायसी आणि आधार सीडींग करणे अत्यावश्यक आहे, नसल्यास शेतकरी लाभापासून वंचित राहतील. त्यासाठी शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषि कार्यालय व तालुक्यातील कृषी सहाय्यक किंवा गाव नोडल अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा म्हणजे लाभापासून कोणीही वंचित राहणार नाही, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

# सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींसाठी सुवर्णसंधी...

## बुलढाणा येथे पाच दिवसीय पशुपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र व जिल्हा उद्योग केंद्रामार्फत उद्योग, व्यवसाय सुरु करु इच्छिणाऱ्या सुशिक्षित बेरोजगार युवक व युवतींसाठी बुलढाणा येथे शेळीपालन, कुक्कुटपालन, गाय, म्हैसपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण दि. १७ ते २१ जुलै २०२५ या पाच दिवसांच्या कालावधीत होणार आहे. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश हा सुशिक्षित बेरोजगार यांनी तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरु करावा हा आहे. या प्रशिक्षणात शेळीपालन, कुक्कुट आणि गाय म्हैस पालनाचे तंत्र व प्रकार, त्यांच्या जाती, लसीकरण, संशोधन, रोग व लक्षणे, खाद्य निर्मिती व चाऱ्याचे प्रकार व उद्योग सुरु करण्यासाठी संपूर्ण सहकार्य केले जाणार आहे. त्यासोबत उद्योजकता विकास, उद्योग संधी मार्गदर्शन, शासकीय योजनाची माहितीचे मार्गदर्शन या प्रशिक्षणात तज्ञ व्यक्ती करणार आहे.

प्रशिक्षणात प्रवेश घेऊ इच्छिणारा उमेदवार हा किमान ५ वी पास, वय १८ ते ६० वर्षे असावे. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र दिल्या जाईल. प्रशिक्षणासाठी नोंदणी प्रक्रिया सुरु झाली असून त्यासाठी दि. १७ जुलैपर्यंत कार्यालयीन वेळेत गणेश गुप्ता प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, तहसील कार्यालय जवळ, चिखली रोड, बुलडाणा यांच्याशी संपर्क साधावा. याशिवाय त्यांना ८२७५०९३२०१/९०११५७८८५४ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे विभागीय अधिकारी किशोर अंभोरे यांनी केले आहे.

# त्या आरोपीला चार दिवसांची पोलिस कोठडी...



जनसंचलन/मलकापूर

शहरात पांढऱ्या चंदनाच्या अवैध तस्करीचा प्रकार ७ जुलै रोजी उघडकीस आला आहे. या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपीला न्यायालयाने ८ जुलै रोजी चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, या तस्करीमागे कार्यरत असलेल्या रॅकेटचा शोध घेण्याचे काम पोलीस करत आहेत. पांढऱ्या चंदनाची तस्करी होत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर मलकापूर पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत ट्रक (क्रमांक एम.एच. १६ ए.व्ही. ९६४४) ताब्यात घेत एकास अटक करण्यात आली. ट्रकमधून चंदनाची लाकडे, भुसा आणि वाहन असा एकूण ३८ लाख ८८ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मी बैल पाठवतो म्हणून शेतकऱ्याला केवळ आश्वासन की मदतही केली? ट्रोलिंगनंतर सोनू सूदने स्वत:च दिलं उत्तर....



**मुंबई:** सोशल मीडियाचा दुरुपयोग वाढला आहे, असं अनेकदा आपल्या कानावर येतं. पण याच सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेकांपर्यंत मदतीचा हातही पोहोचतो. काही दिवसांपूर्वी लातूरमधील एका वृद्ध शेतकरी दाम्पत्याचा व्हिडिओ व्हायरल झालेला. ज्यामध्ये त्यांनी बैलाच्या ठिकाणी औताला स्वतः ला जुंपून घेतलं होतं. हा व्हिडिओ सोशल मीडियावर वाऱ्यासारखा पसरला आणि त्यानंतर या शेतकरी दाम्पत्याला अभिनेता सोनू सूदने मदतीचा हात पुढे केला होता. या व्हायरल व्हिडिओचे ट्वीट रीट्वीट करत सोनूने असं म्हटलं होतं की, तुम्ही नंबर पाठवा, मी बैल पाठवतो. त्यानंतर सोनूने दिलेल्या या आश्वासनाची आठवण करुन देणारे एक ट्वीट समोर आले, आता त्यावर अभिनेत्याने एक स्क्रिनशॉट शेअर करत उत्तरही दिले आहे. लातूरच्या अहमदपूरमधील हडोळती शिवारात अंबादास पवार यांनी स्वत:लाच औताला जुंपलं आणि त्यांना त्यांची पत्नी मुक्ताबाई यांनी साथ दिली. बैलजोडी खरेदी करण्यासाठी पैसे नसल्याने त्यांच्यावर स्वत: नांगर ओढण्याची वेळ आलेली. करोना काळात अनेकांसाठी देवदूत ठरलेल्या सोनूने त्यांना मदत करण्याच आश्वासन दिले. संबंधित शेतकऱ्याला आश्वासन दिल्याप्रमाणे मदत केली का, अशी विचारणा करणाऱ्या एका एक्स युजरला सोनूने स्पष्टपणे उत्तर दिले. अभिनेत्याची टीम स्वत:चे प्रमोशन करण्यासाठी अशा गोष्टी करते, असा आरोपही या युजरने केला होता.

एक्स म्हणजेच ट्विटर प्लॅटफॉर्मवर गुरुप्रीत गॅरी वालिया नावाच्या एका युजरने अंबादास आणि मुक्ताबाई यांचा एक फोटो शेअर करत असा सवाल केला की, हा शेतकऱ्याचा फोटो तुम्हाला आठवतोय का? अभिनेता सोनू सूदने असे लिहिले होते की, तुम्ही नंबर पाठवा, मी बैल पाठवतो. माझ्या अनेकदा हे लक्षात आलं आहे की, सोनू सूद भाई यांची टीम मदत ५ टक्के करते आणि ९५ टक्के पीआर करते.

ज्यांना मदत करायची होती, त्यांनी ती केली. राज्यातील मंत्री बाबासाहेब पाटील यांनी ४२,५०० रुपयांचे कर्ज स्वत: फेडलं आहे. एक्स प्लॅटफॉर्मवर कौतुक मात्र सोनू सूद भाई यांच्या टीमचं झालं. मला कोणी हे सांगेल का, जो माणूस हातांनी शेती करतोय, त्याच्याकडे ट्विटर असेल का? असो, जर सोनू भाई यांनी कोणती मदत केली असेल तर सांगा, मी तेही इथे लिहीन.यावर उत्तर देताना सोनूने अंबादास यांना पाठवेलल्या आर्थिक मदतीचा फोटो शेअर केला आहे. त्याने एक बँक स्टेटमेंट शेअर केले, ज्यामध्ये सोनूच्या संस्थेकडून अंबादास यांच्या नावाने पाठवलेली मदत दिसते आहे. सोनूने या पोस्टमधून असा दावा केला आहे की, माझ्या वाट्याची मदत मी आधीच शेतकरी अंबादास यांना केली आहे. आता तुम्हीही तुमच्या वाटणीची मदत पाठवा.

कसं आहे ना भाऊ, ट्विटरवर विष पसरवून देश चालत नाही. आणखी कोणाला मदत पाठवायची असेल तर मेसेज अवश्य कर. जय हिंद. दरम्यान सोनूने एक्सवर असे उत्तर दिल्यानंतर त्यालाच पुन्हा एकदा टीका सहन करावी लागली. बँक स्टेटमेंटवर असणाऱ्या रेफरन्स क्रमांकावरुन त्याने ७ जुलै २०२५ रोजी अंबादास यांना पैसे पाठवल्याचे म्हटले जातेय. असा दावा केला जातो आहे की, सोशल मीडियावर टीका झाल्यानंतर सोनूने ही मदत पाठवली, पण त्याने मदत करण्याचे आश्वासन मात्र २ जुलै रोजी केले होते.

# मुंबईत ऐक्य, विदर्भात उत्सुकता; दोन्ही पक्षांची स्थिती नाजूक, नव्या समीकरणाकडे लक्ष...

**नागपूर:** नागपूर महापालिका व जिल्हा परिषदेचा विचार करता, काँग्रेसकडून आघाडीसाठी कुणीच उत्सुक नाही. त्याचा फायदा उबाठा- मनसेला होऊ शकतो. काही वर्षांपूर्वी नागपूरसह चंद्रपूर, अमरावती आणि अकोला महापालिकेत मनसेचे सदस्य होते. इथे एकत्रित शिवसेनेलाही दोन अंकी आकडा गाठता आला नाही. जिल्हा परिषद, पंचायत समितीतही मनसेला खाते उघडता आले नाही. उबाठाचा आलेखही खाली घसरला आहे. गेल्यावेळी त्यांचे दोन सदस्य निवडून आले. स्वबळावर लढताना त्यांना उमेदवार मिळणे कठीण झाले होते. मनसेने महापालिकेत एकदाच खाते उघडले. मात्र, नंतर त्यांना संधी लाभली नाही. याच आधारे इतर पक्षांकडून चाचपणी केली जात आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पडघम वाजू लागले असताना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सर्वेसर्वा राज ठाकरे यांनी एकत्रित मेळावा घेतल्याने दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते उत्साहात आहेत. तथापि, ताकद कमी असल्याने दोन्ही पक्षांच्या दृष्टीने नागपूर- विदर्भाच्या राजकीय समीकरणात फारसा फरक पडणार नाही, असे मानले जात आहे. मात्र, निवडणुकांसाठी ठाकरे बंधू एकत्र आले तर विदर्भातील समीकरण कसे राहील, याकडे राजकय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.एकनाथ शिंदे बाहेर पडल्यापासून विदर्भात शिवसेना उबाठाला लागलेली गळती अद्यापही थांबलेली नाही. मनसेला अजूनही पाहिजे तसा जम बसवता आलेला नाही. त्यामुळे दोन्ही पक्ष एकत्र आले तर त्याचा स्थानिक पातळीवर लाभ होऊ शकतो, असा विश्वास कार्यकर्त्यांना वाटतो आहे. निवडणुकांमध्ये महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष काय भूमिका घेतात, यावर शिवसेना- मनसेची युती अवलंबून राहील.मागील काही काळापासून उबाठाचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या प्रमाणात शिवसेनेत प्रवेश करत आहेत. पूर्व विदर्भाचे दोन कार्यक्रम नागपुरात झाले. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता होती. मात्र, दोन्ही बंधू एकत्र येणे आणि नवीन नियुक्त्यांमुळे कार्यकर्त्यांना थोडा दिलासा मिळाला आहे.उद्धव व राज ठाकरे मराठी माणसासाठी एकत्र आले आहेत. त्यांच्या नेतृत्वामुळे आम्हाला निश्चित फायदा होईल. महापालिका निवडणुकीसाठी शिवसैनिक उत्साहात व सज्ज



आहेत. सत्तेसाठी एकत्र आल्याची टीका सत्तारुढ पक्षाकडून आमच्यावर करण्यात येत असली तरी, भाजप आणि उपमुख्यमंत्रीद्वय एकनाथ शिंदे व अजित पवार फुगडी खेळण्यासाठी एकत्र आले का, असा सवाल उबाठाचे संपर्क प्रमुख सतीश हरडे यांनी केला.

ठाकरे बंधू एकत्र आल्याने चांगले वातावरण तयार झाले आहे. मराठीवरून शिवसैनिक मनसैनिकांमध्ये स्फूर्ती आली आहे. नजिकच्या काळात चांगले चित्र राहील. उभय नेत्यांनी राज्याच्या प्रत्येक विभागात तातडीने संयुक्त मेळावे घ्यावे. त्याचे अनुकूल परिणाम दिसून येतील, असा विश्वास मनसेचे प्रदेश सरचिटणीस हेमंत गडकरी यांनी व्यक्त केला. राज्यात भलेही मराठी, हिंदी भाषेचा मुद्दा किंवा परप्रांतीयांचा प्रश्न उपस्थित होत असला तरी, जिल्ह्यात तसेच विदर्भात मराठी वा हिंदी भाषक हा मुद्दा चालत नाही, असा दावा काँग्रेसच्या एका नेत्याने केला.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# माझ्या परवानगीशिवाय मीडियाशी बोलू नका, राज ठाकरेंचा आपल्या नेत्यांना आदेश

**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षातून मोठी बातमी समोर येत आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आपल्या कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना महत्त्वाचा आदेश दिला आहे. राज्यात मराठीच्या मुद्द्यावरुन वातावरण तापताना दिसत आहे. मीरा भाईंदर येथे मनसेकडून आज मोर्चा काढण्यात आला. या घडामोडींवरुन मराठी आणि अमराठी असा वाद तापताना दिसतोय. भाजपच्या काही नेतेमंडळींकडून मनसेला इशारा दिला जातोय. तर मनसेकडूनही त्याला प्रत्युत्तर दिलं जात आहे. मनसे कार्यकर्त्यांनी मीरा रोड येथील एका व्यापाऱ्याला मारहाण केल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर या सगळ्या घडामोडी घडत आहेत. या सर्व घडामोडींवरुन वातावरण



तापलेलं आहे. त्यामुळे अखेर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आपल्या पदाधिकाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना महत्त्वाचा आदेश दिला. राज ठाकरे यांनी त्यांच्या अधिकृत (एक्स) अकाउंटवर याबाबत आदेश दिला आहे. राज ठाकरे यांनी केवळ आपल्या पक्षाच्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांलाच नाही तर मोठे नेते, पदाधिकाऱ्यांनादेखील संबंधित आदेश दिला आहे. पक्षाने नेमून दिलेल्या प्रवक्त्यांनी देखील आपल्याला विचारल्याशिवाय किंवा परवानगी घेतल्याशिवाय कुठल्याही प्रकारच्या माध्यमांशी संवाद साधायचा नाही, असा आदेश राज ठाकरे यांनी आपल्या नेतेमंडळींना दिला आहे. त्यामुळे राज ठाकरे यांच्या मनात नेमकं काय आहे? असा प्रश्न उपस्थित होत आहे. या प्रकरणावर कदाचित राज ठाकरे हे स्वत: पत्रकार परिषद घेऊन भूमिका मांडण्याची शक्यता आहे.ङ्कएक स्पष्ट आदेश… पक्षातील कोणीही वर्तमानपत्रं, वृत्तवाहिन्या किंवा कोणत्याही डिजीटल माध्यमांशी संवाद साधायचा नाही. तसंच स्वत:चे प्रतिक्रियांचे व्हिडीओज सोशल मीडियावर टाकायचे हे पण अजिबात करायचं नाही. आणि माध्यमांशी संवाद साधण्याची अधिकृत जबाबदारी ज्या प्रवक्त्यांना दिली आहे त्यांनी देखील मला विचारल्याशिवाय, माझी परवानगी घेतल्याशिवाय त्यांनी देखील कुठल्याही प्रकारच्या माध्यमांशी संवाद साधायचा नाहीये, आणि सोशल मीडियावर व्यक्त व्हायचं नाहीङ्क, असं राज ठाकरे म्हणाले आहेत. त्यामुळे आगामी काळात आता काय-काय घडामोडी घडतात? ते पाहणं महत्वाचं आहे.दरम्यान, ५ जुलैला नुकतंच वरळी डोम सभागृहात पार पडलेल्या मेळाव्यात राज ठाकरे यांनी आपल्या भाषणात मनसैनिकांना महत्त्वाचा आदेश दिला होता. मराठी भाषा बोलण्यावरुन वाद घालणाऱ्यांना मारहाण करतानाचे व्हिडीओ बनवू नका आणि ते कुठे शेअरही करु नका, असा आदेश राज ठाकरे यांनी दिला होता. यानंतर आता राज ठाकरे यांनी आज आपल्या एक्स अकाउंटवरुन नव्या सूचना दिल्या आहेत.

## जबरदस्तीनं पैशांची मागणी, संतप्त झालेल्या तरुणानं मित्रासोबत...; नागपुरात खळबळजनक घटना

**नागपूर :** नागपूर शहरातील सदर पोलीस ठाणे हद्दीत मंगळवारच्या रात्री एका कुख्यात गुंडाची चाकू व दगडाने निर्घृण हत्या करण्यात आली. ही घटना ताजुद्दीन बाबा दरगाहजवळ, खदान वस्ती, गोंडवाना चौक परिसरात घडली. या हत्येमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत तीन आरोपींना अटक केली असून इतर आरोपींचा शोध सुरू आहे. मृत व्यक्तीची ओळख अजय मुरलीधर गाते (राहिवासी बैरामजी टाऊन, आदिवासी नगर) अशी झाली आहे. अजय हा पूर्वीपासून गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेला असून, त्याच्यावर जरिपटका पोलीस ठाण्यात दुहेरी हत्येचा गुन्हा दाखल होता. याशिवाय, तो दारू आणि एमडी ड्रग्जच्या तस्करीच्या धंद्यातही सक्रिय होता. २०२३ मध्ये तुरुंगातून बाहेर आल्यानंतर त्याने पुन्हा बेकायदेशीर धंद्यांना सुरुवात केली होती. परिसरात दहशत निर्माण करून तो लोकांना त्रास देत होता, अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली.

मंगळवारच्या रात्री अजय हा गोंडवाना चौकाजवळील गल्लीमध्ये बसलेला





होता. त्याच वेळी अनुज कनोजिया आपल्या मित्रांसह त्या मार्गावरून जात होता. अजयने त्यांच्याकडे जबरदस्तीने पैशांची मागणी केली. यामुळे संतप्त झालेल्या अनुजने आपल्या साथीदारांसह अजयवर हल्ला चढवला.

अनुज कनोजिया, अखिलेश ज्ञानेश्वर कंगाली, मुकेश उर्फ अमन चैतू उईके तसेच करण यादव, अमन यादव, ऋतिक पिल्ले आणि शिवम गेडाम या आरोपींनी मिळून अजयवर दगड, विटा आणि धारदार शस्त्रांनी सपासप वार केले. या हल्ल्यात अजयचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच मृतकाचा भाऊ अमित मुरली धर गाते याने सदर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपी अनुज कनोजिया, अखिलेश ज्ञानेश्वर कंगाली आणि मुकेश उर्फ अमन चैतू उईके यांना अटक केली आहे. उर्वरित आरोपी करण यादव, अमन यादव, ऋतिक पिल्ले आणि शिवम गेडाम हे फरार असून त्यांचा शोध सुरू असल्याचे पोलीसांनी सांगितले. या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

अजय गातेच्या दहशतीला कंटाळूनच आरोपींनी ही हत्या केल्याची चर्चा परिसरात आहे. पोलीस घटनास्थळाच्या सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करत असून लवकरच उर्वरित आरोपींना अटक करण्यात येईल, असा विश्वास वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

## स्कूल व्हॅनला रेल्वेची जोरदार धडक, व्हॅन लांब फेकली गेली, तीन शाळकरी विद्यार्थ्यांचा दुर्दैवी अंत, चूक कोणाची?

**चेन्नई:** रेल्वे फाटक ओलांडण्याच्या प्रयत्नात शाळेची व्हॅन आणि रेल्वेच्या धडकेत व्हॅनमधील तीन शाळकरी मुलांचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी तमिळनाडूच्या कुड्डलोर जिल्ह्यात घडली. या रेल्वे फाटकावर नियुक्त असलेल्या फाटक कर्मचाऱ्याला निलंबित करण्यात आले. त्याला अटकही करण्यात आली आहे. तर, दक्षिण रेल्वेने या घटनेबद्दल खेद व्यक्त केला आहे.मंगळवारी पहाटे पावणेआठच्या सुमारास विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी शाळेची व्हॅन कुड्डलोर आणि अलाप्पकम दरम्यान असणारे रेल्वे फाटक क्रमांक १७० ओलांडण्याचा प्रयत्न करत होती. याच दरम्यान ट्रेन क्र. ५६८१३ विल्लुपुरम-मायिलादुथुराई पॅसेंजर रेल्वेने या व्हॅनला धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की, ही व्हॅन रेल्वे फाटकापासून काही अंतरावर फेकली गेली.या भीषण अपघातात तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. यातील इयत्ता बारावीतील १६ वर्षांची मुलगी जागीच मरण पावली तर, तिच्या भावाचा रुग्णालयात मृत्यू झाला. तर, जखमी विद्यार्थी आणि चालकाला कुड्डालोर आणि पुडुचेरीतील रुग्णालयांत उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. अपघात झाला तेव्हा गाडीमध्ये चार विद्यार्थी आणि गाडीचालक होते. व्हॅन आली तेव्हा रेल्वे फाटक बंद होते. मात्र, शाळेत पोहोचायला उशीर होत असल्याने व्हॅनचालकाने ते नियमबाह्यपणे उघडायला लावले, असा दावा दक्षिण रेल्वे विभागातर्फे करण्यात आला. नियमाप्रमाणे फाटक कर्मचाऱ्याने फाटक उघडता कामा नये. त्यामुळे या कर्मचाऱ्याला निलंबित करण्यात आले असून त्याच्यावर निष्काळजीने मृत्यूस कारणीभूत ठरल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. व्हॅनचालक आणि एका जखमी विद्यार्थ्याने मात्र रेल्वे फाटक उघडेच होते, असा दावा केला. सिग्नलही नव्हता. रेल्वेनेही हॉर्न वाजवला नाही. त्यामुळे चालक पुढे गेला आणि इतक्यात ट्रेन आली व अपघात घडला, असा दावा या विद्यार्थ्याने केला.

रेल्वे प्रशासनाने मृतांच्या नातेवाइकांना पाच लाखांची तर, जबर जखमींच्या नातेवाइकांना अडीच लाखांची मदत जाहीर केली. तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनीही इतक्याच रकमांची मदत जाहीर केली आहे.

# फॉर्म्युला जुना, तोच खेळ पुन्हा; ठाकरे बंधूंना शह देण्यासाठी भाजपचा विधानसभा फॉर्म्युला...

**मुंबई:** लोकसभा निवडणुकीत महायुतीला मोठा फटका बसला. पण त्यानंतर विधानसभा निवडणुकीतून भाजपनं कमबॅक केलं आणि तब्बल १३२ जागा जिंकल्या. भाजपनं ऐतिहासिक कामगिरीची नोंद करत बहुमताच्या आसपास जाणारा आकडा गाठला. त्यावेळी राज्यात निर्माण झालेली परिस्थिती आणि आता ठाकरे बंधू एकत्र आल्यानं निर्माण झालेली स्थिती जवळपास सारखीच आहे. त्यामुळे ठाकरे बंधूंना शह देण्यासाठी भाजपनं जुन्याच फॉर्म्युलावर नव्यानं काम सुरु केलं आहे. लोकसभेला मराठा मतदार आरक्षणाच्या मुद्द्यावर भाजपच्या विरोधात गेले. त्यामुळे २८ जागा जिंकणाऱ्या भाजपला केवळ ९ जागा जिंकता आल्या. मराठा मतदार विरोधात गेल्याचं लक्षात येताच भाजपनं विधानसभा निवडणुकीच्या



तोंडावर ओबीसी समाजाला जवळ केलं. ओबीसी प्रवर्गात मोडणाऱ्या जातींसाठी महामंडळांची स्थापना करण्याचा धडाकाच महायुती सरकारनं लावला. त्यामुळे विधानसभेला महायुतीला दणदणीत यश मिळालं.आता हिंदी भाषेच्या सक्तीच्या जीआरमुळे मराठी मतदार भाजपच्या विरोधात जाण्याची शक्यता आहे. ठाकरे बंधू सोबत आल्यानं त्यांच्या बाजूनं मराठी मतदान जाण्याची शक्यताही वाढली आहे. अशा परिस्थितीत भाजप अमराठी मतदान आपल्या बाजूनं वळवण्याचा अधिकाधिक प्रयत्न करताना दिसत आहे. गेल्या आठवड्याभरापासून त्याचे स्पष्ट संकेत दिसू लागले आहेत.खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अमराठी दुकानदाराला मारहाण करणाऱ्या मनसे कार्यकर्त्यांवर कारवाई करण्याचा इशारा दिला. मराठीचा आग्रहध धरा, पण दुराग्रह नको, असं फडणवीस म्हणाले. मंत्री आणि भाजप नेते नितेश राणे यांनी तर मराठी-अमराठी वाद थेट धार्मिक वळणावर नेला. हिंदूंवरील हल्ले सहन करणार नाही. हिंमत असेल तर नळ बाजार, मोहम्मद अली रोडवर जाऊन तिथे टोपी घालून दुकानं थाटणाऱ्यांना मराठी बोलायला लावा, असं राणे म्हणाले. राणे यांचा इशारा अल्पसंख्याक समाजाकडे होता.

यानंतर आज भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी राज ठाकरेंना थेट आव्हान दिलं. आपटून मारण्याची भाषा केली. मराठी-अमराठीच्या वादात भाजपचे नेते अमराठींच्या बाजूनं उभे असल्याचं स्पष्ट दिसू लागलं आहे. हिंदी भाषा सक्तीच्या जीआरच्या माध्यमातून भाजपनं मराठी-अमराठी ध्रुवीकरणाची खेळी केली आहे. ठाकरेंच्या बाजूनं मराठी मतदान गेल्यास अमराठी मतदार भाजपच्या बाजूनं एकवटतील, याची काळजी भाजप घेताना दिसत आहे.

मुंबईत ३२ टक्के लोकसंख्या मराठी आहे. तर मुस्लिम मतदारांचं प्रमाण १४ टक्के आहे. उर्वरित ५४ टक्क्यांमध्ये गुजराती, राजस्थानी, उत्तर भारतीय, दक्षिण भारतीय मतदार येतात. गुजराती, मारवाडी मतदार आधीपासूनच भाजपचा पाठिराखा आहे. तर उत्तर भारतीय समाज सत्तेत असलेल्या राष्ट्रीय पक्षाला मतदान करतो, असा इतिहास आहे. आधी हा वर्ग काँग्रेसला मतदान करायचा. आता भाजप केंद्रात असल्यानं त्यांचं मतदान भाजपकडे जातं. त्यामुळे मराठी-अमराठी असं ध्रुवीकरण झाल्यास ते भाजपच्या पथ्थ्यावर पडण्याची शक्यता आहे.

# चला हवा येऊ द्यामध्ये कलाकारांना मिळणाऱ्या वागणुकीविषयी अभिनेत्याची पोस्ट; म्हणाला- निलेश साबळे सरांनी...

**मुंबई:** चला हवा येऊ द्या चे नवीन पर्व येत्या २६ जुलैपासून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नव्या सीझनमध्ये नव्या कलाकारांसह काही नवीन विनोदवीर झळकणार आहेत. मात्र डॉ. निलेश साबळे , भाऊ कदम, सागर कारंडे हे कलाकार या नवीन पर्वात दिसणार नाहीत. श्रेया बुगडे, भारत गणेशपुरे, कुशल बद्रिके, प्रियदर्शन जाधव आणि गौरव मोरे यांच्यासह हे नवीन पर्व सुरू होत असून, निलेशच्या जागी सूत्रसंचालनाची जबाबदारी अभिजीत खांडकेकरकडे असणार आहे. एकीकडे या पर्वाची चर्चा आणि दुसरीकडे निलेश साबळे राशीचक्रकार शरद उपाध्ये यांचा वाद, यामुळे हा कार्यक्रम विशेष चर्चेत राहिला. आता या कार्यक्रमाविषयी लोकप्रिय अभिनेता आयुष संजीवने एक खास पोस्ट शेअर केली आहे. उपाध्ये यांनी काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत निलेशवर असे आरोप केलेले की, या कार्यक्रमाच्या यशामुळे त्याच्या डोक्यात हवा गेली होती. या सेटवर त्यांना अपमानास्पद वागणूक दिली गेल्याचे त्यांचे म्हणणे होते. दुसऱ्या पर्वातून त्याला डच्चू दिला, असेही वक्तव्य त्यांनी केलेले. त्यावर निलेशनेही उपाध्ये यांना स्पष्ट उत्तर दिले होते. तो स्वत:हून चला हवा येऊ द्यामधून बाहेर पडल्याचे सांगितले. यानंतर सोशल मीडियावर प्रतिक्रियांचा महापूर आला आहे. निलेशसोबत काम केलेल्या अनेक कलाकारांनी त्याला पाठिंबा देणाऱ्या पोस्ट शेअर केल्या आहेत. यादरम्यान आयुषनेही पोस्ट शेअर करत त्याला चला हवा येऊ द्याच्या सेटवर कशी वागणूक मिळालेली, याविषयी भाष्य केले. त्याने झी मराठीसह निलेशचेही कौतुक केले आहे.आयुषने असे लिहिले की, चला हवा येऊ द्या हा कार्यक्रम माझ्यासाठी फक्त एक मंच नव्हता, तर झी मराठीने दिलेलं एक सुंदर गिफ्ट होतं.

माझा पहिला व्हायरल व्हिडिओ इथूनच आला होता आणि अजूनही बरीच लोकं मला त्या व्हिडिओ मुळे ओळखतात. इथली संपूर्ण टीम, कलाकार, दिग्दर्शक, प्रोडक्शन आणि मॅनेजमेंट सगळेच अतिशय प्रेमळ, व्यावसायिक आणि कलाकारांना समजून घेणारे आहेत. नवोदित कलाकारांनाही इथं मोकळेपणाने व्यक्त होता येतं. डॉक्टर निलेश साबळे सरांनी मला ओळखून, समजून घेतलं



आणि व्यक्त होण्याची संधी दिली- त्याबद्दल मी कायम आभारी आहे.

आयुषने या पोस्टमधून झी मराठीचे आभार मानले आहेत. शिवाय वाहिनीसोबत निलेशलाही या पोस्टमध्ये त्याने टॅग केले. आयुषने ज्या व्हिडिओचा उल्लेख केला, तो काही वर्षांपूर्वी व्हायरल झाला होता. जेव्हा तो ३६ गुणी जोडी ही झी मराठीची मालिका करत होता आणि च्या सेटवर पाहुणा म्हणून आलेला. त्याने असे म्हटले की, शाहरुख जेव्हा या कार्यक्रमात पाहुणा म्हणून आलेला तेव्हा आयुष प्रेक्षकांमध्ये बसलेला, त्यानंतर काही वर्षांनी त्याने चला हवा येऊ द्यामध्ये बॅकग्राउंड डान्सर म्हणून काम केलेले आणि अखेर तो पाहुणा म्हणून या कार्यक्रमात आलेला. हे अंतर पार करण्यासाठी त्याला ८ वर्ष लागली. निलेश साबळेसोबत हा क्षण शेअर करताना तो खूपच भावुक झाला होता.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# विदर्भात पूरस्थिती, मध्यप्रदेशाशी संपर्क तुटला, गोसेखुर्द धरणाचे सर्व ३३ दरवाजे उघडले...

**नागपूर:** विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यात दोन दिवसांपासूनच्या संततधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली आहे. बावनथडी नदीच्या पुरामुळे मंगळवारी महाराष्ट्राचा मध्य प्रदेशशी संपर्क तुटला. मागील २४ तासांत भंडारा जिल्ह्यात झालेल्या दमदार पावसामुळे वैनगंगा आणि बावनथडी नदीला पूर आला आहे. या पूरस्थितीमुळे बावनथडी नदीच्या पुलावरील वाहतूक बंद करण्यात आल्याने महाराष्ट्र-मध्य प्रदेशाचा संपर्क तुटला आहे. सकाळपासून पुलाच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या लांब रांगा लागल्या होत्या. यासोबतच वैनगंगा नदीच्या पुरामुळे १८ मार्गांवरील वाहतूक थांबली आहे. मंगळवारी सकाळी ११ वाजता




भंडारा शहराजवळून वाहणाऱ्या वैनगंगा नदीने २४५.५० मीटर ही धोक्याची पातळी ओलांडली होती. त्यामुळे लहान पुलावरून पाणी वाहण्यास सुरुवात झाली. पूरस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी गोसेखुर्द धरणाचे सर्व ३३ दरवाजे उघडण्यात आले आहेत. यासोबतच सर्व सातही तालुक्यांत अतिवृष्टीची नोंद झाल्याने खबरदारीचा उपाय म्हणून दोन दिवस शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. सर्वाधिक पाऊस तुमसर तालुक्यातील सिहोरा मंडळात २३१.५० मिमी इतका झाला आहे.गोंदिया जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस असल्याने अनेक भागांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. नदी, नाल्यांवरील पुलावरून पाणी वाहत असल्याने केशोरी, नवेगावबांध, देवरी, चिचगड, अर्जुनी-मोरगाव, आमगाव हद्दीतील अनेक रस्ते बंद पडले आहेत. जिल्ह्यात सरासरी ११०.६ मिमी इतक्या अतिवृष्टीची नोंद झाली आहे. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून जिल्ह्यातील सर्व शाळा आणि शैक्षणिक संस्थांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. तर दुसरीकडे मध्य प्रदेशातील शिवनी जिल्ह्यातील संजय सरोवराचे दोन गेट तीन फूट उघडण्यात आले आहेत. त्यामुळे वैनगंगा नदीच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता आहे. नदीकाठावरील गावांनी सतर्क राहण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाने दिल्या आहेत. कवलेवाडा येथील पुष्पा पटले यांचे घर अतिवृष्टीमुळे कोसळल्याने त्यांचे संसार उघड्यावर आले आहे.चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी व नागभीड तालुक्यात मागील २४ तासांत धुव्वाधार पाऊस झाला. मागील २४ तासांत ब्रह्मपुरी तालुक्यात १६२.८ मिमी तर नागभीड तालुक्यात १५२.४ मिमी इतक्या पावसाची नोंद झाली आहे. अतिवृष्टीमुळे काही अंतर्गत रस्ते बंद झाले असून दोन्ही तालुक्यातील सुमारे २० घरांचे अंशतः नुकसान झाले असल्याची माहिती समोर आली आहे. पहिलाच मुसळधार पाऊस असल्याने पूरस्थिती निर्माण झालेली नाही. गोसेखुर्द प्रकल्पाचे पाणी वैनगंगा नदीत सोडण्यात आल्याने नागभीड तालुक्यातील डोंगरगाव-नागभीड मार्ग बंद झाला आहे. या अतिवृष्टीने तालुक्यातील शेतीचे नुकसान झाले असून पंचनाम्यानंतरच नुकसानीचा नेमका आकडा समोर येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

## पुण्यात स्पा सेंटरच्या नावे देहविक्री, मायलेकीला रॅकेटमध्ये अडकवलं, २८ वर्षीय मॅनेजर तरुणीला अटक

**पुणे** : लोहगाव येथील पोरवाल रस्ता परिसरातील एका इस्पाफ सेंटरमध्ये मसाजच्या नावाखाली अल्पवयीन मुलींना वेश्याव्यवसायासाठी प्रवृत्त केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात इस्पाफ सेंटरच्या महिला मॅनेजरला अटक केली असून, दोन अल्पवयीन मुलींसह पाच जणींची सुटका करण्यात आली आहे. दरम्यान, अल्पवयीन मुलीसह आई इस्पाफ सेंटरमध्ये वेश्याव्यवसायात ओढली गेल्याची धक्कादायक बाब समोर आली. पोट भरण्यासाठी अन् अधिक पैशांचे आमिष दाखवून इस्पाफचालक महिलेने त्यांना यात ओढले. किरण ऊर्फ अनुराधा बाबूराव आडे, वय २८ वर्ष, रा. खराडी, असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. या प्रकरणी विमानतळ पोलिस ठाण्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध (पीटा) कायदा, पोक्सो कायदा आणि भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुटका केलेल्यांमध्ये १५ आणि १७ वर्षीय मुलींचा समावेश असून, १५ वर्षीय मुलीची आईही याच ठिकाणी देहविक्री करीत होती.गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध विभागाने ही कारवाई केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी महिला संबंधित इस्पाफसेंटरची मालक आणि व्यवस्थापक आहे. तिने तीन तरुणी आणि गरीब कुटुंबांतील १५ वर्षे वयाच्या दोन अल्पवयीन मुलींना मसाजचे काम देण्याचे आमिष दाखवले. त्यानंतर अधिक मोबदल्याचे प्रलोभन देऊन त्यांना वेश्याव्यवसायात ढकलले. गोरगरीब मुलींना



फसवून त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करवून घेतल्याचे निष्पन्न झाले आहे. या महिलेवर यापूर्वी कोणताही गुन्हा दाखल नव्हता. इस्पाफ सुरू करण्यासाठी तिने दोन वर्षांसाठी जागेचा भाडेकरार केला होता, अशी माहिती विभागाच्या वरिष्ठ निरीक्षक आशालता खापरे यांनी दिली.इइस्पाफ सेंटरमध्ये मसाजच्या नावाखाली देहविक्रीचा व्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिस पथकाने छापा टाकून कारवाई केली. त्या वेळी पाच पीडित तरुणी तेथे आढळून आल्या,

अशी माहिती खापरे यांनी दिली.विमानतळ पोलिस ठाण्याच्या हद्दीत साधारण गेल्या सहा महिन्यांपासून सुरू असलेल्या संबंधित इस्पाफ सेंटरबाबत स्थानिक पोलिसांना माहिती कशी मिळाली नाही, की विमानतळ पोलिसांनी जाणीवपूर्वक डोळ्यावर पट्टी बांधली होती, असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

## तुमची सोयरीक पण या टोळीशी नाही ना? अश्विनीचे एकाच वेळी सात तरुणांशी लग्न, पोलिसांनी धडक कारवाई...

आरोपी जगदाळेसह एजंट म्हणून या प्रकरणात काम करणाऱ्या सुवर्णमाला सुरेश वाडकर (रा. छत्रपती संभाजीनगर, मनीषा अडसुळे (रा. नरवीर तानाजी मालुसरे रस्ता, पुणे), भारती दामोदर मोरे, संतोष सखाराम घोडे (दोघे रा. बुलढाणा), सुनील काळे, पंकज डग (दोघे रा. पंचतळे, ता. शिरूर) आणि नामदेव कोल्हे (रा. जांबुत, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) या सात जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. तीन आरोपींना पोलिस कोठडी आणि चौघांना न्यायालयीन कोठडी सुनावी आहे. एक आरोपी फरारी आहे लग्न केल्यानंतर फसवणूक झाल्याची फिर्याद शरद गायकवाड यांनी नारायणगाव पोलिस ठाण्यात दिली होती. त्यावरून आठही आरोपींविरोधात गुन्हा दाखल झाला होता. त्या अनुषंगाने पथकाने बुलढाणा जिल्ह्यात जाऊन सात आरोपींना ताब्यात घेतले होते. त्यांनी दिलेल्या कबुलीवरून



असाच फसवणुकीचा गुन्हा ओतूर पोलिस ठाण्यातही दाखल असून, या टोळीने जुन्नर, पारनेर, शिरूर भागांतही असेच गुन्हे केल्याचे निदर्शनास आले. उपनिरीक्षक जगदेवअप्पा पाटील तपास करत आहेत.युवकांनी विवाहाच्या प्रस्तावांकडे अंधविश्वासाने न पाहता काळजीपूर्वक चौकशी करणे गरजेचे आहे. सोशल मीडियावर किंवा एजंटांमार्फत येणाऱ्या लग्नाच्या ऑफरवर सहज विश्वास ठेवू नये. विवाहापूर्वी संबंधित व्यक्ती व तिच्या कुटुंबाची पार्श्वभूमी नीट तपासावी. अशा फसवणुकीपासून बचाव करण्यासाठी कुटुंबीयांनीही सजग राहणे अत्यंत आवश्यक आहे. शंकास्पद व्यवहार आढळल्यास त्वरित पोलिसांकडे तक्रार करावी

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे प्रवेशद्वार करा विजयकांत गवई

**जनसंचलन/ चिखली**

चिखली शहरातील साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या बाजूला साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे प्रवेशद्वार करण्यात यावे अशी मागणी रिपब्लिकन सेनेच्या वतीने चिखली नगरपालिकेचे मुख्यअधिकारी साहेब यांना निवेदन दि. ८ जुलै २०२५ रोजी देण्यात आले, साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांनी महाराष्ट्राला दिलेले साहित्य खूप अफाट आणि अद्भुत आहे त्यांनी फक्त साहित्य चळवळ चालवले त्यांनी शोषित वंचित आणि दलितांसाठी काम केलं संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील त्यांचा खूप मोठा योगदान आहे त्यांची माणूस ही कादंबरी जगण्याच्या मार्गाने शिकवते त्या काळातलं वास्तव मांडते अण्णाभाऊ यांनी समाजाला महाराष्ट्राला दिशा दाखवण्याचे काम केलं त्यांनी लावण्या, छक्कड, कविता, गाणे, कादंबरी यातून प्रचंड समाजप्रबोधन केलं विशेष म्हणजे त्यांच्या स्वतःच्या जीवनप्रवास हा अत्यंत अडचणीचा होता पण त्यावर मार्ग काढत त्यांनी समाजासाठी काम केलं अण्णाभाऊ साठे यांना लोकशाहीर



ही उपाधी सहज मिळालेली नाही त्यांना आपल्या साहित्यातून राज्याला आणि महाराष्ट्राला दिशा दाखवली या महान साहित्यक होते. महान पुरुष साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे प्रवेश द्वार बांधकाम करून साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या बाजूला करण्यात यावे चिखली शहरांमध्ये हायवे रोड, खामगाव चौफुली आणि चिखली शहरांमध्ये प्रत्येक वार्डात प्रवेशद्वार तयार करण्यात आले आहे. आणि साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या नावाचे प्रवेशद्वार आत्तापर्यंत तयार करण्यात आले नाही मागील निवेदन रिपब्लिकन सेनेच्या वतीने देऊन सुद्धा आज एक वर्ष पूर्ण झाले आहे तरी नगरपालिका साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रवेश द्वाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करताना दिसतात साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याजवळ प्रवेशद्वार येत्या आठ दिवसाच्या आत तयार करण्यात यावे अन्यथा रिपब्लिकन सेनेच्या वतीने आंदोलन करण्यात येईल असा इशारा रिपब्लिकन सेनेचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष भाई विजयकांत गवई यांनी निवेदनामध्ये दिला. निवेदन देतेवेळी रिपब्लिकन सेनेचे ब्रह्माभाऊ साळवे, सलीमभाई, सतीश पवार, विकी निकाळजे, सौरभ बावस्कर, विशाल काकफळे, नागेश अंभोरे, स्वराज क्षीरसागर, देवानंद चांदणे, निलेश अंभोरे, अकित गवई, अमोल काकफळे, संतोषभाउ बावस्कर उपस्थित होते.

# सहकार नांदुरा शहरातील सीएैची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा बुलडाणा अर्बन बुलडाणा शाखा नांदुरा तर्फे सत्कार



**जनसंचलन/ नांदुरा**

महत्वाची व प्रतिष्ठेची समजली जाणारी परीक्षेचा अंतिम निकाल ६ जुलै रोजी जाहिर करण्यात आला. या परिक्षेत नांदुरा शहरातील फुटपाथवर पाणीपुरी, भेळ इत्यादी व्यवसाय करणारे रविंद्र द्वारकादास शर्मा यांचा मुलगा जितेंद्र शर्मा हा मे २०२५ मध्ये झालेल्या सि ए च्या परीक्षेत उत्तीर्ण झालेला आहे, एका सामान्य पार्श्वभूमीतून आणि मर्यादित संसाधनामधून आलेल्या जितेंद्र याने कधीही परिस्थितीला आपले नशीब ठरवू दिले नाही. रात्रंदिवस दीर्घ अभ्यासाने आणि अथक परिश्रमाने त्याने ही हि प्रतिष्ठित पदवी मिळवली आहे. तसेच नांदुरा शहरातील प्रसिद्ध व्यापारी श्री रोशनकुमार डागा यांचा मुलगा साहिल रोशनकुमार डागा हा सुद्धा सिए ची परीक्षा उत्तीर्ण झाला . जितेंद्र शर्मा याचा सत्कार नांदुरा शाखेचे स्थानिक संचालक श्री संतोषजी डोडिया यांनी केला तसेच साहिल डागा यांचा यांचा सत्कार नांदुरा शाखेचे स्थानिक संचालक ऍडव्होकेट श्री मधुसूदनजी राठी यांनी केला. सदर सत्कार प्रसंगी बुलडाणा अर्बन बुलडाणा नांदुरा विभागीय व्यवस्थापक सचिन झंवर, शाखा व्यवस्थापक संदीप माहेश्वरी व कर्मचारी उपस्थित होते.

# राज्यस्तरीय बहुजन रत्न पुरस्काराने देविदास शर्मा सन्मानित...

**जनसंचलन/बुलढाणा**

करवीर नरेश आरक्षणाचे जनक राजर्षी छत्रपती शाहू जी महाराज यांच्या जयंती निमित्त ऋणानुबंध समाज विकास संस्था चिखली द्वारा संचालित तुकाराम आश्रम वृध्दाश्रम. सुलोचना माहेरघर लताई बाल अनाथालय व्दारा आयोजित मान कतृत्वाचा सम्मान नेतृत्वाचा राज्य स्तरीय बहुजन रत्न पुरस्कार २०२५ देऊन खामगाव येथील सतिफैल भागातील ❊देविदास शर्मा यांना सम्मानित करण्यात आले सामाजिक. धार्मिक.क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी देविदास शर्मा यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला ऋणानुबंध समाज विकास संस्था व्दारे आयोजित सामाजिक उपक्रमाचा भाग म्हणून विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सत्कार करण्यासाठी राज्य स्तरीय बहुजन रत्न पुरस्कार चे आयोजन करण्यात येते यामध्ये बहुजन महापुरुष यांच्या विचारावर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या. कर्तृत्व घडवणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात येते. यामध्ये पुरस्कार २०२५ साठी खामगाव येथील सामाजिक कार्यकर्ते. शांत. संयमी.धार्मिक क्षेत्रात भरीव योगदान देणारे श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाचे पारदर्शक निस्वार्थ सेवा भावी कार्य पाहून मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देविदास ऊर्फ मुन्नाभाऊ शर्मा याना राज्य स्तरीय बहुजन रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला श्री शिवाजी कला वाणिज्य महाविद्यालय चिखली येथे मोठ्या थाटात भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते देविदास शर्मा व त्यांचे सहकारी सेवा निवृत्त पी. एस आय, शेषरावजी अंभोरे साहेब. विनोद सुकाळे. दिलीप झापर्डे. अरूण कडवकर. यांना सम्मांन पत्र. शिल्ड.पुष्प बुके .व पुष्पहार घालून हा पुरस्कार प्रदान करण्यात आला .हा सम्मांन केवळ एक वैयक्तिक गौरव नव्हे तर सतिफैल खामगाव साठी खूप मोठी गौरवाची गोष्ट आहे मागील २५ वर्षापासून धर्म सेवा. गरीब व वंचित समाजहितासाठी सामाजिक उपक्रम लोकशाही मुल्यात रूजवणाऱ्या सामाजिक क्षेत्रात सक्रिय आहेत त्यांच्या कार्याचा केंद्र बिंदू नेहमी मानव सेवा सामाजिक क्षेत्रात गरीबांसाठी अन्नदान ब्लँकेट वाटप पक्ष्यां साठी पाणी पात्र वाटप असे अनेक उपक्रम वर्ष भर श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळ राबवित असते त्याच्या कार्याची दखल घेत ऋणानुबंध समाज विकास संस्था यांच्या वतीने त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला या प्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक राष्ट्रवादी चे नेते मनोज दांडगे.कार्यक्रमाचे अध्यक्ष बहुजन चळवळीतील विचारवंत ॲड साहेबराव शिरसाट.



प्रा, डॉ सुभाष राऊत.मुकुंद सोनवणे. वैभव गिते. प्रमुख मार्गदर्शक कैलास सुखदाने . कुणाल पैठणकर. पत्रकार दीपक मोरे. आयोजक संस्थेच्या अध्यक्षा लता अविनाश डोंगरदिवे. तथा पुरस्कार निवड समितीचे व्यवस्थापक प्रशांत डोंगरदिवे.प्रताप भांबळे .विक्की शिनगारे.राजेश गवई.जय सायराम त्रीदल. विजय खिल्लारे.नितिन फुलझाडे.हिंम्मतराव जाधव.बाळु भिसे.सेवा निवृत्त शेषरावजी अंभोरे साहेब. विनोद सुकाळे. दिलीप झापर्डे. अरूण कडवकर. सुरेखा निकाळजे. पंचफुला गवई. कमलाकर व्यवहारे.सतिष पैठणे. मनोज जाधव.रघुनाथ गवई.राजेंद्र सुरडकर .विजय खरात. गणेश श्रीवास्तव.दयानंद निकाळजे. देवानंद वानखडे.यांच्या सह राज्यातील बहुसंख्य मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती होती सुत्रसंचालन प्रशांत डोंगरदिवे यांनी तर प्रास्ताविक ॲन्ड सी पी इंगळे यांनी आभार एस एस साळवे यांनी केले देविदास शर्मा यांना मानाचा राज्य स्तरीय बहुजन रत्न पुरस्कार मिळाल्यामुळे सर्वच स्तरावरून शर्मा यांच्या वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे या आधी देविदास शर्मा यांना इंडियन एक्सलन्स अवार्ड २०२५. तसेच महाराष्ट्र राज्य भुषण पुरस्कार मिळाले आहे

# केंब्रिज कॉलेज ऑफ फार्मसी येथे बी. फार्मसीसाठी सुविधा केंद्रास शासन मान्यता...

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील नामांकित स्व. रामभाऊजी लिंगाडे प्रतिष्ठान संचालित केंब्रिज कॉलेज ऑफ फार्मसी, येथे बी. फार्मसी व बी फार्मसी थेट द्वितीय वर्ष अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुलभ करण्याच्या दृष्टीने सुविधा केंद्रास शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष (CET Cell ), महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशानुसार, २०२५-२६ शैक्षणिक वर्षासाठी बी. फार्मसी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केंब्रिज कॉलेज ऑफ फार्मसीला अधिकृत सुविधा केंद्र म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. यामुळे परिसरातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेसाठी मोठ्या शहरांमध्ये जाण्याची गरज भासणार नाही. सुविधा केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरने, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी, माहिती व मार्गदर्शन आदी सेवा विनामूल्य दिल्या जाणार आहेत. प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक तांत्रिक व मानवी संसाधनांची पूर्तता संस्थेमार्फत करण्यात आली आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांचे वेळ आणि आर्थिक नुकसान टळणार असून, प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता आणि सुलभता येणार आहे. संस्थेचे




अध्यक्ष विधान परिषद पदवीधर आमदार मा. श्री. धीरज भाऊ लिंगाडे व प्राचार्य डॉ. सुशीलकुमार शिंदे यांनी सर्व विद्यार्थ्यांना या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# पाइप चोरी प्रकरणी चौघांना पोलिस कोठडी...

जनसंचलन/ चिखली

चिखली एमआयडीसीमधील पाइप चोरीप्रकरणी अटक करण्यात आलेल्या चौघा आरोपींना ९ जुलै रोजी सिंदखेडराजा न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना १० जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. ६ जुलै रोजी रात्री चिखली-लव्हाळा रोडवर राजस्थान येथून आलेल्या चार ट्रकमधून पाइप चोरी होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. यापैकी एका ट्रकचालकाने पळ काढला, मात्र मेहकर पोलिसांनी त्याचा पाठलाग करून ट्रक जप्त करत आरोपींना ताब्यात घेतले. शारदा इन्फ्राटेक या कंपनीच्या प्रकल्पस्थळी १५ लोखंडी पाइप चोरी करून नेत असताना या आरोपींना पकडले. संबंधित पाइपची एकूण किंमत ४,६१,८५० रुपये असल्याचे कंपनीकडून स्पष्ट करण्यात आले आहे. पोलिसांनी यावेळी दोन ट्रक जप्त केले असून दोन आरोपी अद्याप फरार आहेत. अटक आरोपींमध्ये वसीम अक्रम, खालिद रहमू, अकबर खान आणि शाहरुख खान यांचा समावेश आहे, तर नौशाद खान आणि साकीर रहमान हे दोघे फरार आहेत. याप्रकरणी जबरी चोरी, दरोडा, जिवे मारण्याचा प्रयत्न, तसेच मोटार वाहन कायद्यान्वये विविध गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

# बुलढाण्यातील ६६ सरपंच आरक्षण जाहीर, चिमुकल्या निशांत ने काढली ईश्वर चिठ्ठी




जनसंचलन/बुलढाणा

शरद पाटील उपविभागीय अधिकारी तथा निरीक्षक यांचे अध्यक्षतेखाली विठ्ठल कुमरे तहसीलदार तथा निवडणूक अधिकारी बुलढाणा यांचे उपस्थितीत बुलढाणा तालुक्यातील ६६ ग्रामपंचायतचे सरपंच आरक्षण आज ८ जुलै रोजी काढण्यात आले. सहा वर्षीय निशांत नितीन पाटील याने ईश्वरचिठ्ठी काढली.

अनुसूचित जाती एकूण १२ जागा पैकी ६ महिलांसाठी राखीव, अनुसूचित जमातीच्या ३ जागा पैकी २ जागा महिलांसाठी राखीव, नागरिकांचा मागास प्रवर्ग १८ जागा पैकी ९ जागा महिलांसाठी राखीव तसेच सर्वसाधारण च्या ३३ गसरपंच पदाच्या १७ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहे.

यावेळी बुलढाणा तालुक्यातील ग्रामपंचायतचे सरपंच , उप सरपंच नागरिक, तलाठी, मंडळ अधिकारी व निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार शशिकांत वाघ, अव्वल कारकून सविता तायडे, महसूल सहाय्यक नितीन रिंढे, अजय राऊत तसेच महसूल सेवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते


# बोगस बियाणे व उर्वरित पीक विमा संदर्भात स्वाभिमानीचे जिल्हाध्यक्ष निलेश नारखेडे यांचे कृषी आयुक्त, पुणे यांना निवेदन

जनसंचलन/बुलढाणा

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवक जिल्हाध्यक्ष निलेश नारखेडे यांनी कृषी आयुक्त पुणे यांना निवेदन देत २०२४ २५ या वर्षातील उर्वरित पिक विमा अध्यापही शेतकऱ्यांना मिळाला नसून पहिलेच शेतकरी अस्मानी सुलतानी संकटांनी घेरला असून हक्काच्या पीक विम्यासाठी दोन दोन तीन तीन वर्ष शासना सोबत भांडव लागत आपण आमचे माय बाप सरकार म्हणून आम्हाला न्याय द्यावा चौफेर शेतकरी विविध संकटांनी घेरला असून शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट निर्माण झालेली आहे. तसेच बुलढाणा जिल्ह्यात बोगस बियान्याने कहर माजवला असून मलकापूर नांदुरा तालुक्यातील लाखाच्या वर शेतकरी बोगस बियांच्या तडाख्यात सापडले आहे. या सर्व भ्रष्ट प्रकारा मुळे शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून याची भरपाई कंपनी करण्यास नकार देत आहे. या कंपन्यांवर कठोर कारवाई व्हावी ही आपल्याला विनंती दोन्ही विषयावर सखोल चौकशी करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा अन्यथा आपल्या कार्यालयावर हजारो शेतकऱ्यांच्या



समवेत तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने देण्यात आला.




# वेणी येथील श्याम कटारे सहा महिन्यांसाठी तीन जिल्ह्यांतून तडीपार...

जनसंचलन/मेहकर

गंभीर गुन्ह्यांमध्ये वॉण्टेड असलेल्या श्याम पांडुरंग कटारे (३५, रा. वेणी, ता. लोणार) याला बुलढाणा, वाशिम आणि जालना जिल्ह्यांतून सहा महिन्यांसाठी तडीपार करण्यात आले आहे. सोमवारी (दि. ७) मेहकर पोलिसांनी ही कारवाई करत त्याला छत्रपती संभाजीनगर येथील वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीत सोडले. कटारे याच्यावर लोणार, मेहकर परिसरातील विविध पोलिस ठाण्यांत दहशत निर्माण, दमदाटी, मारहाण, बेकायदेशीर जमावबंदीचे उल्लंघन, सार्वजनिक शांतता भंग करण्याचे गुन्हे दाखल आहेत. तो सातत्याने स्थानिक अधिकाऱ्यांना धमक्या देत असल्याचे निदर्शनास आल्याने उपविभागीय अधिकारी मेहकर यांच्या आदेशानुसार ही तडीपारीची कारवाई करण्यात आली. या कारवाईत पोलिस निरीक्षक नितीन तायडे यांच्या नेतृत्वाखाली पो.ना. पद्माकर आळणे, तस्लीम पठाण, लक्ष्मण कटके, इंद्रसिंग सोनुने, अमोल वडे आदींचा सहभाग होता. पोलिस अधीक्षक डॉ. नीलेश तांबे, अपर पोलिस अधीक्षक बाबूराव महामुनी, उपविभागीय अधिकारी प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनात ही कार्यवाही पार पडली. गुन्हेगारी प्रवृत्ती रोखण्यासाठी पोलिसांची ही तडीपारी कारवाई महत्त्वाची ठरली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८